PEER Reviewed & Refereed JOURNAL

ISSUE-26 VOLUME-7 MPACT FACTOR-SJIF-6.586, IIFS-4.125

ISSN-2454-6283 अक्तुबर–दिसंबर, 2021

AN INTERNATIONAL MULTI-DISCIPLINARY RESEARCH JOURNAL

IMPACT FACTOR- IIJIF-7.312 NEW

# शोध-ऋतु

## 7



सम्पादक
डॉ. सुनील जाधव

तकनीकी सम्पादक
अनिल जाधव

पत्राचार हेतु कार्यालयीन पता -
डॉ.सुनील जाधव,
महाराणा प्रताप हाउसिंग सोसाइटी,
हनुमान गढ़ कमान के सामने,
नांदेड-४३१६०५, महाराष्ट्र

web:- www.shodhritu.com
Email - shodhrityu78@yahoo.com
WhatsApp 9405384672

(ओशो ध्यान केंद्र राजनांदगांव, छत्तीसगढ़ से संबंधित सन्यासियों के विशेष संदर्भ में)......57
–डॉ.स्नेह कुमार मेश्राम......57
18.असगर वजाहत की कहानियों में राजनीतिक व्यवस्था विरोधी स्वर......61
–अम्बेकर बाबूराव......61
19.प्रेम विवाह की व्यंग्य छटाएँ......64
–डॉ.मीना सुतवणी......64
20.पंजाब के लेखक गोपाल शर्मा फिरोजपुरी कृत कहानियों का मूल्यांकन......68
–डॉ0 सरोज बाला......68
21.कृष्णदत्त पालीवाल की साहित्य के सरोकार विषयक आलोचना दृष्टि......70
–नवनीत......70
22.भारतीय नवजागरण और रामविलास शर्मा......74
–प्रीति मिश्रा......74
23.कला साधना......77
–डॉ. सारिका बाला मिश्रा......77
24.झारखण्ड के महिला कलाकारों के कथा–साहित्य में दलित विमर्श......80
–दीपिका कुमारी......80
25.अज्ञेय की कविताओं में व्यंग्य......83
–डॉ0 सुनीता......83
26.छूटती धरती : बिखरता जीवन (गुरूबचन सिंह के कथा साहित्य के संदर्भ में)......86
–पल्लवी कुमारी निषाद,......86
27.रेणु की कहानियों में आंचलिकतावादी संसार का यथार्थ बिम्ब......89
–रवीन्द्र कुमार......89
28.भारत मे जाति व्यवस्था......93
–अनिलकुमार हनुमानदास गुप्ता......93
29.गिरिपार लोक कथाओं में लोक जीवन......96
–दिनेश कुमार......96
30.उ0प्र0 के बरेली मण्डल की ग्रामीण बेरोजगारी उन्मूलन में स्वर्ण जयन्ती ग्राम्य स्वरोजगार योजना की भूमिका का अवलोकन .98
–[1]संगीता सक्सेना, [2]डॉ0 अनुराग अग्रवाल......98
31.स्वातंत्र्योत्तर कविता का मूल्यांकन......100
–डॉ व्ही.सी ठाकुर......100
32.A Study On Investment Practices Adopted By Business Individuals During Covid-19 Pandemic......102
-Dr. Nilesh Tukaram Waghmare......102
33.भारतातील दहशतवाद......106
–प्रा.दिनकर सुदामराव रासवे......106

research.**2.**The data was collected only from 100 business individuals due to time constraints. Respondents' response may or may not be correct. Hence, we cannot totally rely on the responses received from the questionnaire.**3.**The study does not look into the demographic profile like the location and the investment experience of the investors, which can have a major impact on the investment pattern. **4.**In future studies, demographic variables can be studied as the moderating variables, which can affect theinvestment behavior of these business individuals.

**Conclusion:-**The present study can conclude that investment patterns of business individuals have shown slight change in the investment behavior as a result of the pandemic. The recent increase in the number of IPOs, unicorns, decacorns and other reasons, business individuals have changed their priorities to share markets and mutual funds and will continue to follow this trend in the future.

**Bibliography and Webliography:-**

**A.Published Papers:** •Dewan, A., Gayatri, R., & Dewan, R. (2019). A Research on Investment Behavior of Corporate and Individual Investors from Southern India. International Journal of Innovative Technology and Exploring Engineering. •Bhatnagar, Vinod. (2013). Investment Behavior Of Investors - A Study Of Railway Employees At Gwalior. Transformation and Survival of Business Management: Challenges and Opportunities, Macmillan Publisher India Ltd., pp 217-226

**B.Websites:-**

•https://www.ijsr.net/archive/v4i5/SUB153997.pdf

•https://economictimes.indiatimes.com/markets/ipos/fpos/ipo-market-poised-to-make-record-28-companies-raise-rs42000-crore-70-more-coming-soon/articleshow/86526840.cms

## 33.भारतातील दहशतवाद

*–प्रा.दिनकर सुदामराव रासवे*

राज्यशास्त्र विभागप्रमुख,

व्यंकटेश महाजन वरीष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना :–**दहशतवाद ही एक प्राचीन संकल्पना असून काळानुरूप तिचे स्वरुप बदलत गेले. मनुष्य टोळी अवस्थेत असताना एका टोळीद्वारे दुस-या टोळीला गुलाम बनविले जात असून हिंसेचा आणि बळाचा वापर करून सदस्यांत भिती निर्माण केली जात होती. या काळापासून दहशतवाद अस्तित्वात आहे. दहशतवाद ही एक अखंड अशी प्रक्रिया आहे. जी मनुष्याच्या निर्मितीपासून सुरू झाली आहे व आजपर्यंत चालू आहे. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात दहशतवाद अस्तित्वात होता. फक्त त्याचे स्वरुप, व्याप्त आणि लक्ष्य यामध्ये बदल होत गेले. मध्ययुगाच्या काळातही ही प्रवृत्ती अस्तित्वात होती. बळी तो कान पिळीचा नियम होता. मत्स्यन्यायानुसार व्यवस्था चालत होती. बलवानांच्या दहशतीखाली दुर्बलांना आपले जीवनयापन करावे लागत होते.आधुनिक काळात दहशतवादाची निर्मिती ही औद्योगिक क्रांतीने झाली. औद्योगिक क्रांतीने जगाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडवून आणले. नवीन मूल्यांवर आधारीत समाजव्यवस्थेच्या निर्मितीस सुरूवात झाली. राजकीय उद्देशांसाठी दहशतवादाचा वापर फ्रेंच राज्यक्रांतीपासून मानला जातो. या राज्यक्रांतीने दहशतवादाला आधुनिक रुप प्राप्त करून दिले भय आणि हिंसेचा वापर करून आपला राजकीय उद्देश साध्य करून घेतला गेला. औद्योगिक क्रांतीने अनेक नवीन विचार उदयास आले. भांडवलशाही, साम्राज्यवाद आणि वसाहतवाद निर्माण झाला. त्याची प्रतिक्रिया म्हणून जगात समाजवाद आणि साम्यवादाचा विचार विकास पावला. या दोन्ही विचारांनी आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी हिंसेचा वापर केला. त्यातून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे दहशतवादाला प्रोत्साहन मिळाले.भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दहशतवादाची समस्या अधिकच व्यापक बनली आहे. काश्मिरपासून सुरू झालेल्या हिंसक आंदोलनाने आज पूर्ण देशात आपले पाय रोवले आहेत. काश्मीर हा पाकिस्तानचा अविभाज्य भाग आहे व तो पाकमध्ये समाविष्ठ केल्याशिवाय आपण शांत बसणार नाही अशी शपथच पाकच्या आय.एस.आय. या गुप्तचर संघेने घेतली आहे. सीमेपलीकडून होणा-या दहशतवादाबरोबरच भारतातही अशा काही दहशतवादी संघटनांचा उदय झाला. ज्यांनी देशात हिंसेचे तांडव निर्माण केले. आसाममधील उल्फा असेल किंवा

पंजाबमधील स्वतंत्र खलीस्तानवादी दहशतवादी संघटना किंवा नक्षलवादी संघटना यांनी देशात हिंसात्मक आंदोलन करून भितीचे वातावरण निर्माण केले.

**संशोधन निबंधाचे उद्देश :–** (1)भारतातील दहशतवादी समस्येचे खरे स्वरुप समजावून घेणे.(2)दहशतवादाच्या विविध प्रकारांची माहिती करून घेणे.(3)दहशतवादाच्या उदयास कारणीभूत ठरणा-या घटकांचा शोध घेणे.(4)भारतातील दहशतवादावर प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.

**गृहितके :–** (1)दहशतवादी हल्ल्यांमुळे भारतात अनेक वेळेस अंशतः किंवा पूर्णतः परीवर्तन झाले आहे.(2)भारतातील दहशतवाद काही प्रमाणात धार्मिक भावनेने प्रेरीत झालेला दिसतो.(3)दहशतवाद विरोधी अनेक कायदे भारताने केले आहेत परंतू राजकीय उदासीनता, शासनातील समन्वयाचा अभाव यामुळे दहशतवाद आटोक्यात येत नाही.(4)व्होट बँकेच्या राजकारणामुळे दहशतवाद प्रतिबंधक कायद्यांची योग्य अंमलबजावणी होत नाही.

**संशोधन पध्दती :–**प्रस्तुत शोध लेखाच्या अध्ययनासाठी संशोधनाचे विश्लेषणात्मक व वर्णनात्मक तंत्र उपयोगी ठरते. म्हणून विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब प्रस्तुत लेखासाठी करण्यात आला आहे. तसेच तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने द्वितीयक साधनांचा उपयोग करण्यात आला. त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी.

**विषय मांडणी :–**19 व्या शतकाच्या शेवटी आणि बंगालच्या फाळणी काळात दहशतवादी किंवा क्रांतीकारी गटाची निर्मिती झाली. ब्रिटीश शासनाच्या अन्याय अत्याचाराविरुध्द काही तरुणांनी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केला. ब्रिटीश शासनाला भारतीयांचा आवाज ऐकू जावा यासाठी या संघटनांनी क्रांतीकारीमार्ग स्वीकारला. भारताच्या राजकारणात 19 व्या शतकाच्या अखेरीस हे दहशतवादाचे किंवा सशस्त्र क्रांतीवादाचे राजाकरण जन्माला आले. बंगालच्या फाळणीकाळात ब्रिटीशांनी जाणिवपूर्वक सांप्रदायिक फुट पाडण्याचा प्रयत्न केला गेला. परंतू तो भारतीयांनी यशस्वी होऊ दिला नाही. परंतू ब्रिटीशांची निरंकुश सत्ता भारतात दहशवादाच्या निर्मितीस कारणीभूत ठरली. फोडा व राज्य करा या सुत्राचा उपयोग करून ब्रिटीशांनी भारतात कायमची सांप्रदायिक दुही निर्माण केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात दहशतवादाची समस्या अधिकच व्यापक बणली आहे. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत दहशतवादाने आपले पाय भारतात रोवले आहेत. सीमेपलिकडून दहशतवाद काश्मीरपर्यंत थांबला नाही तर त्याने संपूर्ण भारतात आपले जाळे निर्माण केले. या व्यतिरीक्त भारतात अशाही काही दहशतवादी संघटनांचा उदय झाला. ज्यांनी देशात हिंसेचे तांडव निर्माण केले. आसाममधील उल्फा असेल, पंजाबमधील खलिस्तानी दहशतवादी संघटना असतील यांनी देशात हिंसेच्या माध्यमातून भितीचे वातावरण निर्माण केले. प.बंगालमध्ये निर्माण झालेल्या नक्षलवादाने देशात हिंसात्मक कृत्ये केली व सरकारी अधिकारी, पोलीस यांना लक्ष्य बनविण्यात आले.

सन 1980 च्या दरम्यान पंजाब राज्यात दहशतवादी कारवायांना वेग आला. यात पाकिस्तानने महत्त्वाची भूमिका बजावली. पंजाबमधील शिख तरुणांतील असंतोषाचा फायदा घेवून त्यांना दहशतवादाच्या मार्गाला लावले गेले. 1971 च्या पाकीस्तान–बांगलादेश विभाजनात भारताचा मोठा वाटा आहे. त्याचा सूड उगवण्यासाठी पंजाबमधील दहशतवादास पाकने प्रोत्साहन दिले. पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात हिंसा घडवून आणली गेली. स्वतंत्र खलीस्तानची मागणी तीव्र बनली. देशाच्या अखंडतेला धोका निर्माण करणारे अनेक गट पंजाब आणि देशात निर्माण झाले. त्याला नियंत्रणात आणण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना ऑपरेशन ब्लू स्टार आणावे लागले. खलीस्तानवादी गटांचे बंड मोडीस निघाले परंतु त्याचा सूड घेण्यासाठी इंदिरा गांधीच्या शिख अंगरक्षकाने त्यांना गोळ्या झाडल्या आणि भारत एका मोठ्या नेतृत्वाला अकाली मुकला.देशाच्या दक्षिणभागात नक्षलवादाने उग्ररूप धारण केले. आज नक्षलवादी आग भारताच्या 40 टक्के भागात पसरली आहे. नक्षलवादी चळवळीचा प्रभाव पश्चिम बंगाल, छत्तीसगड, बिहार, झारखंड, ओडीशा, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र या राज्यात अधिक आहे. या चळवळीने देशाच्या शासनापुढे मोठे आव्हान उभे केले आहे. भारतातील या नक्षलवादी चळवळीला पाकीस्तान, बांग्लादेश यांच्याकडून मोठ्या प्रमाणात समर्थन व शस्त्रास्त्रांची उपलब्धता करून दिली जात आहे. आज एकप्रकारे हे सुडाचे राजकारण झाले आहे.

**उपाययोजना :–**भारतामध्ये दहशतवादाला प्रतिबंध घालण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात आल्या. त्यामध्ये TADA, POTA, MCOCA सारख्या दहशतवाद प्रतिबंधक कायद्याची निर्मिती करण्यात आली परंतू त्यातील काही त्रुटीमुळे हे कायदे रद्द करण्यात आले. त्यामुळे दहशतवाद प्रतिबंधक नीवन कायदा एवढा व्यापक असावा सध्या देशात घडत असलेल्या प्रत्येक देश विघातक कृत्यांचा त्यात समावेश व्हावा. तसेच दहशतवाद प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी करणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी. प्रत्येक जिल्हा पातळीवर (ATS) दहशतवाद प्रतिबंधक पथकाची निर्मिती करण्यात यावी.

दहशतवादाच्या प्रश्नावर सरकारने राजकारण करू नये. कायद्याने केलेल्या कठोर उपाययोजनांची अंमलबजावणी निरपेक्षपणे झाली पाहिजे. दहशतवादाला आर्थिक मदत करणा-या, अंमली पदार्थांच्या तस्करीवर कडक नजर ठेवून त्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. अवैधपणे भारतात राहणा-या बांगलादेशी आणि नेपाळी नागरीकांना आवश्यक त्या उपाययोजना करून परत पाठवावे. भारतात घुसलेल्या 5 कोटी बांगलादेशी नागरीकांना कुठल्याही कारणामुळे भारतात ठेवू नये.

**संदर्भग्रंथ सूची :–** (1)म.न.उदगावकर : एकविसाव्या शतकातील दहशतवाद, डायमंड प्रकाशन, पुणे–2007 (2)कोळवणकर प्रकाशः नक्षलनामा, सुमेरू प्रकाशन, मुंबई–2003(3)पुनियानी राम : दहशतवाद म्हणजे..? मिथके आणि वास्तव, भाष्य प्रकाशन, पुणे–2008(4)हुसेन मुझफ्फर : लादेन दहशतवाद आणि अफगाणिस्तान, चंद्रकला प्रकाशन, पुणे–2008(5)मानचन्द खण्डेला : आंतक का अर्थशास्त्र, अरीहंत पब्लि. हाऊस, जयपूर–2002(6)मो. गो.मातापुरकर : दहशतवाद तुमच्या घरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे–2002

ISSN-2454-6283 PEER Reviewed JOURNAL